पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 14/03/2019 (गुरूवार)
(दुपार)

---

## विनयभंग

पो.स्टे. जलालखेडा :– दि. 13/02/2019 चे 18:00 वा. चे सुमारास 35 वर्षीय पिडीत/फिर्यादी या घरी हजर असतांना आरोपी नामे– गणेश सुधाकर ढाणे, वय 29 वर्ष, ता. नरखेड, जि. नागपूर हा दारू पिऊन पिडीतेच्या घराजवळ आला व शिवीगाळ करू लागला. पिडीतेने आरोपीला हटकले असता त्याने पिडीतेच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 354(अ), 504, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार श्री. संजय इंगोले हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. वेलतुर :– अंर्तगत 8 कि. मी. अंतरावर पचखेडी येथे दि. 12/03/2019 चे 20:00 वा. ते 20.30 वा. चे सुमारास फिर्यादी नामे– नरहरी नामदेव मेश्राम, वय 45 वर्ष, रा. पचखेडी हे त्यांच्या नौकर प्रल्हाद नरूले यांच्या सोबत रोडने जात होते. दरम्यान यातील आरोपी क्र. 1) ताराचंद नत्थु पाटील, 2) नलु ताराचंद पाटील व विधीसंर्धषग्रस्त बालक, रा. पंचखेडी कुही यांनी फिर्यादीला पाहुन शिवीगाळ केली. फिर्यादीने त्यांना हटकले असता आरोपी क्र 1) ने हातात काठी घेवुन धावला असता फिर्यादीने ती काठी हुकवली असता ती काठी प्रल्हाद निलकंठ नरूले, वय 40 वर्ष, रा. जिवनापुर पुनरवसन यांच्या डोक्यावर लागल्याने रक्त निघाल्यने ते ओरडले असता फिर्यादींची आई नामे– पुष्पा नामदेव मेश्राम, वय 60 वर्ष, रा. पचखेडर या मध्यस्थी आल्याने त्यांना सुध्दा आरोपीने हातबुक्याने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम 324, 323, 504, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार रमेश धामने हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर